**उलटतपास शपथेवर सुरु :—**

१५. हे म्हणणे खरे आहे की, माझे शपथपत्रामधील कलम १० मधील मजकुराप्रमाणे प्रतिवादीने दावामिळकत व्यवसायिकांना दिलेली आहे व त्यामधून प्रतिवादी उत्पन्न मिळवतात हे दाखविण्यासाठी मी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींना पत्र पाठवून मी त्यांच्याकडून मला भाडे रक्कम मिळावी म्हणून मागणी केलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी दावामिळकत भाड्याने दिलेली आहे व त्यामधून उत्पन्न मिळवतात हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादींच्याकडे बांधकामासाठी किती खर्च झाला याची विचारणा केली हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादीकडे बांधकामासाठी झालेल्या खर्चाची गुंतवणूक सांगण्यासाठी वारंवार विनंती केली हे दाखविण्यासाठी मी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींना दिलेले पैसे केवळ गुंतवणूक म्हणून दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रामध्ये कलम १० मधील शेवटच्या पाच ओळीमधील गुंतवणूकीबाबतचा मजकुर खोटा आहे.

१६. हे म्हणणे खरे आहे की, मी गुंतवणूक केलेली रक्कम दावामिळकतीच्या बांधकामासाठी दिली हे दाखविण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रामधील कलम ८ मधील मजकुर “Considering Urgent need many time ....... therefore I am the co-owner of the said building” हा मजकुर दाव्यामध्ये तंतोतंत लिहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, हा मजकुर मी प्रथमतः माझ्या शपथपत्रामध्ये लिहिलेला आहे. मी प्रतिवादी क्र.२ अचलदत्त दवे यांना रोख स्वरुपामध्ये रक्कम देत होतो. सदरची रक्कम प्रवितादी क्र.२ ने स्विकारले हे दाखविण्यासाठी मी कोणतीही कागदपत्रे शपथपत्रासोबत दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पुष्पा दवे यांनी मी

दावामिळकतीचा सहमालक आहे याबाबतचा कोणताही कागद तयार केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पुष्पा दवे व माझे वडिल यांचे एकत्र पंजाब नॅशनल बॅंक, शाखा लक्ष्मी रोड, रविवार पेठ, पुणे येथे खाते होते. हे म्हणणे खरे आहे की, या दोघांनी मला हे खाते चालविण्यासाठी किंवा हाताळण्यासाठी लेखी स्वरुपामध्ये संमती दिलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी किरीट इंटरप्रायजेस यांना कधीही प्रत्यक्षपणे वादातील रक्कम दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, किरीट इंटरप्रायजेस यांना माझ्या आईने कंत्राटदार म्हणून नियुक्त केलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईने जेव्हा किरीट इंटरप्रायजेस यांना पैसे दिले त्यावेळी मी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मी जे तथाकथित पैसे प्रतिवादी क्र.२ व माझ्या आईला दिलेले होते ते पैसे दावामिळकतीच्या बांधकामासाठी वापरले हे दाखविण्यासाठी मी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावामिळकतीच्या बांधकामासाठी एकूण किती खर्च आला हे दाखविण्यासाठी मी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

१७. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या अतिरिक्त पुरावा शपथपत्रामधील कलम ५ मधील पा.क्र. ४ वरील मजकुर “I state that in the year 2009 the construction .................. of the suit property taken by me on 21/09/2009” हा मजकुर दाव्यामध्ये लिहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, हा मजकुर मी प्रथमतः शपथपत्रामध्ये लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, या शपथपत्रामधील कलम ५ मध्ये ज्या फोटोंचा उल्लेख केलेला आहे त्या फोटोवर दि.२१/०९/२००९ चा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, या तथाकथित फोटोशिवाय दि. २१/०९/२००९ रोजी मी दावामिळकतीला भेट दिली हे दाखविण्यासाठी मी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावामिळकतीचे बांधकाम चालू असताना मी वेळोवेळी दावामिळकतीमध्ये भेट दिली हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे

आहे की, माझ्या अतिरिक्त पुराव्याच्या शपथपत्रामध्ये कलम ६ मधील पा.क्र.५ वरील मजकुर "I State that on various occasions we the family members ................ of the get-together on occasion my 25th marriage anniversary on 24/03/2010." हा मजकुर दाव्यामध्ये लिहिलेला नाही आणि हा मजकुर मी प्रथमतः शपथपत्रामध्ये लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, या कलम ६ मध्ये उल्लेख केलेल्या फोटोवर दि.०५/०८/२००९ आणि दि.२४/०३/२०१० या तारखांचा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, हे फोटो दि.०५/०८/२००९ आणि दि.२४/०३/२०१० रोजी काढलेले होते हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही.

१८. हे म्हणणे खरे आहे की, माझा विवाह झाल्यानंतर मी प्रतिवादी आणि माझ्या आई—वडिलांपासून वेगळा राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी वेगळा राहत असल्यामुळे प्रतिवादींनी व माझ्या आई—वडिलांनी जे काही आर्थिक निर्णय घेतलेले होते त्यामध्ये माझा सहभाग नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दावामिळकतीचा पुनर्विकास करण्याच्या निर्णयामध्ये माझा सहभाग नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, पुष्पा दवे व प्रतिवादींनी त्यांच्या पैश्यामधून दावामिळकतीचा पुनर्विकास केलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, दावामिळकतीचा पुनर्विकास करण्यासाठी मी कधीही पैसे दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, पुष्पा दवे जिवंत असताना त्यांनी दावामिळकतीवर जे बांधकाम केलेले आहे त्याबाबतचे खरेदीखत, बक्षिसपत्र वेळोवेळी प्रतिवादींनी करुन दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ यांनी दि.२०/१०/२०१५ रोजी मला नोटिस पाठविल्यानंतर मी पूर्वग्रहदूषित होऊन हा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावामिळकतीमध्ये माझा कोणताही हक्क नाही त्यामुळे मला दावामिळकतीमध्ये हिस्सा मागण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावामिळकतीमध्ये मला मिळणारे भाडे मागण्याचा तसेच दरम्यानचे उत्पन्न मागण्याचा कोणताही हक्क नाही.

हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.....**

**फेरतपास काही नाही....**

श्रवणोत्तर स्विकृती,

SHRINIVAS SAHEBRAO KADAM
Digitally signed by SHRINIVAS SAHEBRAO KADAM
Date: 2026.08.13 13:10:26 +0530

**पुणे** **(एस.एस. कदम)**
**दि. १२/०८/२०२६** **९वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पुणे.**